पुढारी

# डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन अंतर्गत जर्नालिझम डिप्लोमा प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनांतर्गत पीजी डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन हे देशातील पत्रकारितेचे पहिले अध्यासन आहे. अध्यासनाच्या वतीने गेल्या दोन वर्षांपासून पीजी डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम हा अभ्यासक्रम चालविला जात आहे. वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात. कुठल्याही विषयाचे पदवीधर विद्यार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतात. प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाणार आहे. शनिवार, रविवार या दोन दिवशी विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग चालतात. नवीन तंत्रज्ञान, आयसीटी, डिजिटल वेब जर्नालिझम, ऑडिओ, व्हिडीओ ग्राफिक, डेटा जर्नालिझम, मीडिया इथिक्स, मीडिया लॉ आदी विषयांचे ज्ञान, प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाते. अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाबरोबर पत्रकारितेचे ज्ञान मिळत असल्याने सर्व क्षेत्रांतील माहिती अवगत असणारे विद्यार्थी तयार होणार आहेत. प्रवेश अर्जाची अंतिम मुदत दि. १० जुलै आहे. अधिक माहितीसाठी प्रा. डॉ. रत्नाकर पंडित (मोबाईल नं. ९८२२४४६९३९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

# १३ हजार झाडांच्या हिरवाईने विद्यापीठ समृद्ध



**वृक्ष लागवड विशेष**

कोल्हापूर टाइम्स टीम

हिरवागार परिसर, घनदाट वृक्षराजी, ठिकठिकाणी पाण्याचे साठे, त्यातील पोहणारे मासे, माशावर टपून बसलेले बगळे आणि इतर पक्षी, मधूनच पळणारा ससा, पहाटेपासून ऐकायला येणारी मोरांची केकारव, रानात नाचणारे आणि फिरणारे मोर. हे वारंवार दिसणारे चित्र आहे, कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातील. मागील काही वर्षांपासून विद्यापीठाचा परिसर हा कोल्हापूरचा ऑक्सिजन हब म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. या परिसरातील जैवविविधता अनेकांच्या आकर्षणाचे केंद्र बनत चालली आहे.

शिवाजी विद्यापीठाचा जवळपास ८०० एकर परिसर सुमारे १३ हजार विविधांगी झाडांच्या गर्द हिरवळीने समृद्ध बनला आहे. भाषा भवन तलाव आणि संगीतशास्त्र इमारतीशेजारील तलावापाठोपाठ विद्यापीठात ठिकठिकाणी शेततळी तयार करण्यात आली. यांचा उपयोग कायमस्वरुपी पाणी साठा करण्यासाठी न करता त्यातून जमिनीत पाणी मुरवले जाऊ लागले. या सर्वांचा परिणाम विद्यापीठातील झाडावर झाला आणि परिसर आणखी हिरवा दिसू लागला. विद्यापीठाच्या स्थापनेपासून वृक्ष लागवडीचे कार्य सुरू झाले. सुरुवातीला मुख्य इमारतीच्या भोवती लावलेले वटवृक्ष हळहळू विशाल रुप धारण करत आहेत. मुख्य इमारतीच्या दक्षिण बाजुला असणारा पिंपळाचे झाड अनेक पक्षांनी गजबजलेले असते. त्याला फळे लागल्यानंतर ऐन उन्हाळ्यात पक्षांचा असणारा मधूर किलबिलाट मन मोहवून टाकतो. अशा या परिसरात अगदी सुरुवातीच्या काळात रेन ट्री, वड, पिंपळ, अकेशिया या झाडांची लागवड झाली. विद्यापीठातही सुबाभूळ मोठ्या प्रमाणात लावण्यात आली. आज आपणास सुबाभूळ हे झाड नकोसे वाटत असले तरी त्याकाळात जलद वाढणारे झाड म्हणून लागवड झाली. या वृक्षांच्या छायेत आज अतिथीगृहाच्या पाठीमागे आणि विद्यार्थिंनी वसतिगृहाच्या मागील बाजूस मोरानी आपला आसरा शोधला आहे. या भागात मोरांची संख्या मोठी आहे. मोरांचे ते रात्रीचे निवासाचे ठिकाण बनले आहे.



संपूर्ण हिरवाईने आच्छादलेली शिवाजी विद्यापीठाची मुख्य इमारत व हिरवाईने नटलेला परिसर

## विद्यापीठ परिसर बनलाय कोल्हापूरचा ऑक्सिजन पार्क

त्यानंतर वनस्पतीशास्त्र विभागामार्फत आंबा आणि चिंच या झाडांची लागवड पर्यावरण शास्त्र इमारतीच्या टेकडीवर करण्यात आली. तसेच पदार्थविज्ञान विभागातील बायोमास रिसर्च सेंटरमार्फत मोठ्या प्रमाणात लवकर वाढणारी झाडे म्हणून ग्लिरसिडिया, सुबाभूळ, निलगिरी, मॅंजियम या झाडांची लागवड झाली. ही झाडेही आज मोठी झाली आहेत. मागील दहा वर्षांपासून मात्र ही वृक्ष लागवड विशिष्ट पद्धतीने सुरू करण्यात आली. यामध्ये फळझाडावर भर देण्यात आला आहे. पूर्वी मुख्य इमारतीच्या मागे नारळाची असणारी बाग काही आंब्याची, अर्जुन, जांभूळ आणि चिंचेची झाडे वगळता फारशी फळझाडे नव्हती. मात्र मागील दहा वर्षांपासून आंबा, चिक्कू, जांभूळ, फणस, उंबर, पिंपळ, नारळ, विलायती चिंच, चिंच या झाडांच्या लागवडीवर भर देण्यात आला आहे. या झाडांच्या फळापासून उत्पादन घेण्यापेक्षा जैवविविधतेस पोषक वातावरण तयार करण्याचा प्रयत्न यामाध्यमातून करण्यात येत आहे.

या सोबत साग, शिसम, करंज अशा झाडांची लागवडही करण्यात आली आहे. या झाडांची लागवड करताना जाणीवपूर्वक देशी वाण निवडण्यात आले आहेत.

> विद्यापीठाचा उद्यान विभागही दरवर्षी वृक्ष लागवड आणि वृक्ष संवर्धन यामध्ये आघाडीवर आहे. यातूनच २०० नारळ वृक्ष लागवड करून कुलपती उद्यानाची निर्मिती करण्यात आली आहे. पुढील दहा वर्षांत विद्यापीठाचा पूर्ण परिसर हिरव्या आच्छादनाने झाकलेला असेल यादृष्टीने विद्यापीठ वृक्ष लागवड आणि संवर्धन करत आहे. विद्यापीठ वृक्ष लागवडीच्या बरोबरीने वृक्ष संवर्धनावर भर देत आहे. त्यामुळेच हा परिसर सर्वांच्या आकर्षणाचे केंद्र बनत आहे.
>
> – डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

### विविध प्रजातीची झाडे

पर्यावरणशास्त्र विभागातर्फे करण्यात आलेल्या वृक्ष गणनेनुसार विद्यापीठात १३००० पेक्षा जास्त वृक्ष आहेत. यामध्ये वड, पिंपळ, अर्जुन, चिंच, बहावा, साग, उंबर, विलायती चिंच, बाभूळ, सुबाभूळ, ग्लिरीसिडिया, ॲकेशिया, ऑस्ट्रेलियन ॲकेशिया, नारळ, आंबा, जांभूळ, पाम, कडूनिंब, पुत्रवंती, कैलासपती, गोरख चिंच, रेन ट्री, बांबू, अशोक, गुलमाहोर, निलमोहोर, निलगिरी अशा विविध प्रजातींचा समावेश आहे. वनस्पतीशास्त्र विभागामार्फत पश्चिम घाटातील नामशेष होऊ लागलेल्या झाडांचे संवर्धन करण्याचा प्रयत्न लिड बॉटनिकल गार्डनच्या माध्यमातून होत आहे.

पुढारी

# विद्यापीठाच्या स्वयंसेवकांची 'निर्मल वारी, हरित वारी..'

## 'एनएसएस'चे एक हजार विद्यार्थी दिंडीत सहभागी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी आषाढी वारीचे स्वागत करण्याबरोबरच 'निर्मल वारी,हरितवारी' अभियानराबविण्याचा निर्धार केला आहे. वारीसमवेत चालताना वारकऱ्यांच्या सेवेबरोबरच स्वयंसेवक अभियानाअंतर्गत कृती कार्यक्रमही राबवित आहेत.

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात सातारा जिल्ह्यातील नीरा येथे आषाढी वारीचे आगमन होताच कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी आणि वारकऱ्यांचे स्वागत केले. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून तिन्ही जिल्ह्यांतून आलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या एक हजार स्वयंसेवकांसमवेत कुलगुरू डॉ. शिंदे नीरा ते लोणंद दहा किलोमीटरच्या दिंडीत सहभागी झाले.

गतवर्षीप्रमाणे यंदाही राज्य शासनाने वारीमध्ये 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषाला 'निर्मल वारी, हरित वारी' या घोषणेची जोड दिली आहे. घोषणेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचे काम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ व श्री अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आपापल्या कार्यक्षेत्रात करणार आहेत. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाच्या स्वयंसेवकांनी नीरा येथे पुणे विद्यापीठाच्या स्वयंसेवकांचेही स्वागत केले. ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीच्या स्वागतापूर्वी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी उपस्थित स्वयंसेवकांशी संवाद साधला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या 'निर्मल वारी, हरित वारी'त सहभागी झालेल्या एनएसएसच्या विद्यार्थ्यांसमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर. व्ही. गुरव आदी. (छाया : तय्यब अली)**

### स्वयंसेवक राबविणार स्वच्छता मोहीम

विद्यापीठाचे स्वयंसेवक आपापल्या कार्यक्षेत्रातील सर्वच ठिकाणी पालखीच्या मुक्कामी वारकऱ्यांची सेवा करीत असतात. निर्मल वारी अभियानांतर्गत हे स्वयंसेवक स्वच्छता मोहीम राबविणार आहेत. वारीच्या मार्गावर ठिकठिकाणी वृक्षारोपण करून 'हरित वारी' अभियानही राबविणार आहेत.

विज्ञान



डॉ. व्ही. एन. शिंदे

# पाणी आले... पाणी चालले

पावसाळा सुरु झाला. मागील आठ दिवसांपासून पावसाने उडविलेली दैना हा बातमीचा विषय बनला आहे. चारच दिवसांपूर्वी पंचगंगा तहानलेली होती. आज पंचगंगा दुथडी भरुन वाहत आहे. डिसेंबर-जानेवारीपासून पाणीटंचाईच्या बातम्या येत होत्या. आज पावसाने केलेल्या नुकसानीच्या बातम्यांनी वृत्तपत्रे भरली आहेत. दरवर्षी मुंबई कशी तुंबली, याची चर्चा सुरु होते. एकीकडे पावसाने होणाऱ्या नुकसानीवर आपण टीका करतो, तर दुसरीकडे नद्यांना आलेल्या पुराचे आम्हाला कौतुक असते. पाणी येते आणि जाते. यामध्ये काय करायला हवे, याचा विचार होत नाही.

मागील काही वर्षांपासून हे दरवर्षी अनुभवत आहोत. त्याचे खापर अधिकारी आणि निसर्गावर फोडत आहोत. मात्र, आपणच याला जबाबदार आहोत हे लक्षात घेत नाही. आपल्या हस्तक्षेपाने दिवसेंदिवस निसर्ग लहरी होत आहे. मानवाने पाण्याची गरज भागविण्यासाठी पावसाच्या पाण्याची साठवण करणे आवश्यक आहे. त्याऐवजी आपण भूजलाचा अनिर्बंध वापर सुरु केला. ही भूजलपातळी दरवर्षी भरुन काढणे आवश्यक असते. त्यासाठी अनेक घटक अनुकूल असावे लागतात. ते तसे नसतील तेथे जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. मात्र, अनेक वर्षे या बाबीकडे दुर्लक्ष होत आहे. परिणामी, अनेक भागांत पाण्याची पातळी ही ५०० फुटांपेक्षा जास्त खोल गेली आहे.

जगातील पावसाच्या सरासरीपेक्षा भारतात दोन इंच पाऊस जास्त पडतो. भारतात दरवर्षी सरासरी ४३ इंच पाऊस पडतो. महाराष्ट्रात तर सरासरी ४८ इंच पाऊस पडतो. मात्र, भारतात यातील सहा टक्के पाणी साठविण्याची क्षमता आहे. भारतात एकूण पावसाच्या पाण्यापैकी केवळ १० टक्के पाणीच जमिनीत मुरते.



पावसाच्या पाण्यातील १७ टक्के पाण्याचे बाष्पीभवन होते. त्यामुळे ६ टक्के धरणात साठविले जाणारे पाणी आणि १० टक्के जमिनीत मुरणारे पाणी या दोन घटकांचा शेतीसाठी उपयोग होतो. ज्या पाण्याची वाफ होते, त्यावर आपण नियंत्रण आणू शकत नाही. अशी ३३ टक्के पाण्याची विभागणी झाल्यानंतर, सरासरी ६७ टक्के पाणी नद्यांमधून वाहत राहते. त्यातील पावसाळा संपल्यानंतर वाहणाऱ्या पाण्यातील काही पाणी शेती आणि उद्योगांना वापरले जाते. मूळ पावसाळ्यात वाहणाऱ्या पाण्यापैकी बहुतांश पाणी समुद्राला जाऊन मिळते. त्याचा मानवाच्या आवश्यक कारणांसाठी फायदा होत नाही. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले, तर महाराष्ट्रातील एकूण बागायती शेतीपैकी केवळ ३० टक्के शेती ही धरणे आणि कालव्यांच्या साहाय्याने पिकविली जाते, तर ७० टक्के बागायती शेती ही विहिरी, विंधन विहिरी यांच्यावर अवलंबून आहे.

पावसाळ्यात शेतीला पाणी द्यायची गरज भासत नाही. तेव्हा असणारे अतिरिक्त पाणी वाहून जाते. ते जमिनीत मुरविणे किंवा जिरविणे आवश्यक आहे. जमिनीवरील पाण्याची साठवण क्षमता वाढविणे आणि समुद्राला जाऊन मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाण घटविणे आवश्यक आहे. तसेच पावसाळ्यात कालवे भरुन ठेवायला हवेत. परिणामी, पाणी जमिनीत मुरण्याचे प्रमाण वाढेल.

पाणीप्रश्नावर मोठ्या प्रमाणात विलासराव साळुंखे यांनी कार्य केले होते. त्यांनी बारमाही बागायती शेतीसाठी प्रत्येक कुटुंबाला अर्ध्या एकरासाठी पाणी दिल्यास ते कुटुंब सुखात राहते, असा निष्कर्ष मांडला. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही मोहीम प्रयोगातून सिद्ध केली. पावसाचे पाणी कमीत कमी वाहून जाईल याचा त्यांनी प्रयत्न केला. जमिनीतील पाण्याचे बाष्पीभवन, जमिनीवरील जलसाठ्याच्या बाष्पीभवनापेक्षा कमी होते. ते पाणी सुरक्षित राहते.

कोल्हापूर जिल्ह्यात केवळ १२ मध्यम आणि ६० लहान साठवण प्रकल्प आहेत. त्यात एकूण ८७ टीएमसी पाणी साठविले जाते. राधानगरी, काळम्मावाडी, चित्री, कुंभी, कासारी, तिलारी सारे प्रकल्प २० वर्षांपूर्वीच झाले. शहरे वाढली, लोकसंख्या वाढली. साठवण क्षमता मात्र तेवढीच. आपलेही बहुतांश पाणी वाहून जाते. म्हणूनच शाहूवाडी तालुक्यातील ४८ गावांत पाणीटंचाई ही बातमी येते. 'पाणी आले.. पाणी चालले' हे वेळीच थांबवायला हवे!

(लेखक विज्ञान व तंत्रज्ञान विषयाचे अभ्यासक आणि शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव आहेत.)

## 'विदेशी भाषा'ची प्रवेश प्रक्रिया सुरु

कोल्हापूर : सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षासाठी शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या रशियन, जर्मन, जपानी भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची प्रक्रिया सुरु झाली आहे. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश अर्ज भरण्याची मुदत दि. १० जुलैपर्यंत आहे. या अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता प्रत्येकी ५० आहे. यासाठी बारावी उत्तीर्ण किंवा समकक्ष अशी प्रवेश अर्हता आहे. रोज सायंकाळी एक तास याप्रमाणे वर्ग असतात. उद्योग, पर्यटन, हॉटेल, माहिती तंत्रज्ञान, अशा विविध क्षेत्रांत विदेशी भाषा अवगत असणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध असतात. प्रवेशाबाबतच्या अधिक माहितीसाठी विदेशी भाषा विभाग येथे संपर्क साधावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.